Vol 4 Issue 5 Nov 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-5 | Nov-2014
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# *मराठी साहित्यशारदेच्या मंदिरातील नंदादीप : वि. स. खांडेकर*

*रेश्मा आझाद पाटील*

विद्यार्थीनी पीएच. डी मराठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर .

***सारांश :-***प्रस्तुत लेखात साहित्यिक वि . स . खांडेकर यांच्या साहित्यसंपदेचा आढावा घेण्यात आला आहे . खांडेकरांनी लिहिलेल्या कथा, रूपककथा, कादंबऱ्या, लघुनिबंध, आत्मचरित्र, व समीक्षा या सर्व वाङ्मयप्रकारांविषयी विस्ताराने विवेचन केले आहे . या विवेचनातून खांडेकरांच्या लेखनाची वैशिष्टये, अर्थ गर्भता, तत्वचिंतन, त्यांचा साहित्य विषयक दृष्टीकोन , त्यांच्या साहित्य निर्मितीतील प्रेरणास्तोत्र व त्यातून फुलत गेलेले त्यांचे साहित्यविश्व याव्दारे खांडेकरांचा साहित्यपट हळूवारपणे उलघडून दाखविण्यात आला आहे .

### *प्रस्तावना:—*

मराठी साहित्य रसिकाना उच्च जीवनमूल्यांची आणि अभिरूची–संपन्ना अशा वाङ्मयाची ओढ लावणारे मानवतावादी साहित्यिक म्हणून वि . स . खांडेकर सर्वपरिचित आहेत . सतत पंचावन्ना वर्षे लेखन करून मराठी साहित्यात आपल्या लेखनाने खांडेकरानी अनन्यसाधारण स्थान मिळविले आहे .

खांडेकरांचे मुळ नाव गणेश आत्माराम खांडेकर असे होते . त्यांचा जन्म ११ जानेवारी १८९८ मध्ये सांगली येथे झाला त्यांचे शिक्षण सांगली व पुणे येथे झाले वडिलाना आलेला अर्धांगवायूचा झटका व नंतर त्यांचा मृत्यु यामुळे खांडेकराना खूप खडतर परिस्थितीतून जावे लागले पुण्यात इंटरच्या वर्गात शिकत असताना त्यांच्या जमीनदार चुलत्यानी त्याना दत्तक घेतले . १३ जानेवारी १९१६ रोजी त्यांचे दत्तकविधान झाले आणि गणेश आत्माराम खांडेकर हे विष्णु सखाराम खांडेकर झाले . आपल्या शिक्षणाला आधार मिळेल म्हणून खांडेकर दत्तक गेले खरे पण तेथे खांडेकरांचा भ्रमनिराश झाला . दत्तक वडिलांचे प्रेम तर राहोच पण साधी मायाही मिळाली नाही . जरूरीपुरतेही पैसे न आल्याने व वारंवारच्या आजारपणामुळे कंटाळून ते परत नाणेलीला आपल्या दत्तक घरी परत आले . या काळात खांडेकरांचे विपुल वाचन मात्र होत होते . अगरकरांच्या विचारांचे आणि जीवनाचे संस्कार त्यांच्या मनात रूजत होते . अगरकरांप्रमाणेच श्री . कृ . कोल्हटकर, हरी नारायण आपटे, केशवसुत यांच्या वाङ्मयाच्या वाचनाने व्यापक आणि पुरोगामी समाजिकदृष्टी खांडेकरांना येऊ लागली . समाजासाठी त्यागपूर्ण जीवन वेचणे आवश्यक आहे . या महान कर्तव्याची जाणीव त्यांच्या मनात पक्की रूजली . शिक्षक बनून खेडयाचे रूप पालटून टाकण्याची इच्छा ते मनाशी बाळगू लागले आणि योगायोगाने १२ एप्रिल १९२0 या दिवशी शिरोड्याला ते शिक्षक म्हणून रूजू झाले . याच साली ‘उद्यान’ मासिकात त्यांची कविता प्रकाशित झाली . कुमार या टोपण नावाने खांडेकरांनी कवितालेखन केले . ‘डोळ्यात दाटले प्राण, रांगण्याकडे दे कान .’ ही त्यांची कविता खूप प्रसिध्द झाली . लोकमान्य टिळकांच्या निधनावर खांडेकरांनी ‘तिलकाष्टक’ हे काव्य लिहिले . हे काव्य प्रथम चं . वि . बावडेकरांच्या ‘श्रीकृष्णमाला’ या हस्तलिखितासाठी दिले . नंतर डॉ . अ . ना . भालेराव यांच्या ‘अरविंद’ मासिकातून ते छापून आले . ‘घरी एकच पणती मिणमिणती, म्हणू नको उचल चल लगबगती .’ या त्यांच्या कवितेच्या ओळी अविस्मरणीय ठरल्या .

सावंतवाडीत घडलेल्या एका क्रूर कौटुबिंक घटनेने खांडेकरांचे मन हेलावून गेले आणि या घटनेवर आधारित ‘घर कुणाचे?’ ही कथा एका रात्रीत खांडेकरानी लिहून पूर्ण केली . १९१९ साली लिहिलेली ही कथा १९२३ साली ‘माहाराष्ट्र साहित्य’ या मासिकाच्या दिवाळी अंकातून प्रसिध्द झाली आणि कथा लेखक म्हणून खांडेकरांची यशस्वी वाटचाल सुरू झाली . ‘काव्य किंवा विनोद

या पेक्षा कथा हेच तुमच्या प्रकृतीधर्माला अनुकुल क्षेत्र आहे.' असे श्री.कृ.काल्हटकर यानी खांडेकराना लिहिले. आपल्या लेखनगुरूचे हे स्पष्ट शब्दातील मत खांडेकराना स्फूर्ती देऊन गेले. शिरोड्यासारख्या खेड्यातील आणि भोवतालच्या विशाल समाजसंसारातील त्यांच्या अनेक अनुभवानी कथारूप धारण केले १९२५ ते १९३0 या काळात खांडेकरानी शे–पाऊणशे कथा लिहिल्या. ञ त्यांचा कथासंभार विस्तारत गेला. द्या सत्तावीस कथासंग्रहांच्या रूपाने तो सुसंचित झाला. खांडेकरांच्या या कथासंभाराचे प्रामुख्याने तीन कालखंड पडतात.

१९२५ ते १९३0 पर्यंतचा कालखंड हा त्यांच्या कथालेखनाच्या दृूष्टीने उमेदवारीचा कालखंड मानला जातो. आपल्या या काळातल्या कथे विषयी खांडेकर म्हणतात, 'या काळातील माझी कथा सदोष असली तरी ती माझी स्वत:हाची होती. ती नाकीडोळी नीट्स नसेल! पण सजीव होती. माझ्या स्वत:च्या उत्कट अनुभूतीचा आणि जीवनविषयक दृष्टिकोणाचा ठसा घेऊन ती जन्माला यत असे. मी अनुभवलेल्या भावभावना, सामाजिक सुखदु:खांच्या माझ्या मनावर होणाऱ्या तीव्र पतिक्रिया, साहित्याच्या संस्कारक्षमतेवरील माझी दृढ श्रध्दा आणि कथेचे काव्याशी अगदी अंतरंगातले जे नाते आहे त्याची मला झालेली जाणीव या सर्वांचे मिश्रण त्याकाळात माझ्या कथेत दिसून येईल.' खल्पित आणि वास्तव यांचे सुंदर मिश्रण खांडेकरांच्या या काळातील कथात आढळते. 'आंधळ्यांची भाऊबीज,' 'भावाचा भाव,' 'जांभळीची शाळा तपासणी,' 'शिष्याची शिकवण' या काही उल्लेखनिय कथा याच कालखंडातील आहेत.

१९३१ ते १९४0 हा खांडेकराच्या कथालेखनाचा दुसरा टप्पा दर्शविणारा कालखंड आहे. याकाळात त्यांची कथा बहरली, लोकप्रिय झाली. तंत्राच्या दृष्टीने विस्कलीत असली तरी आशयाच्या दृष्टीने विलोभनिय ठरली. त्यांच्या या कथात ध्येयवाद आहे, गरीबांविषयी वाटणारा कळवळा आहे, अन्यायाची आणि समाजिक विषमतेची चीड आहे, दांभिकवृत्तीचा उपहास आहे त्याचप्रमाणे स्त्रीजीवनाच्या सुखदु:खाचे प्रसंग, वेगवेगळ्या समस्या यांचा उहापोहही आहे. मध्यमवर्गीय समाजाच्या संसाराचे चित्रण, त्यातील त्यागाचे प्रसंग याकाळातील कथानकात विपुल प्रमाणात आहेत. आर्थिकविषमता हा त्यांच्या बऱ्याच कथाचा विषय आहे. गरीबांची श्रीमंताकडून चाललेली पिळवणूक तसेच श्रीमंतांचा बेजबाबदारपणा या काळातील कथामधून खांडेकरानी आवेशाने मांडला आहे. विशिष्ट ध्येयासाठी जीवनसर्वस्व वाहणाऱ्या ध्येयवादी व्यक्तींचे चित्रण त्यांच्या या काळातील कथामधून प्रभावीपणे चित्रित झाले आहे. मजुरांच्या चळवळीत पडून पतिचा त्याग करणारी मणी (आज आणि उद्या), मजुरांच्या संपात एकनिष्ठतेने काम करणारा विश्वनाथ (फुले आणि दगड), कोकणातल्या समाजाची दु:खे पाहून आय्.सी.एस् वर आणि मृदुलेसारख्या श्रीमंत, सुंदर प्रेयसीवर पाणी सोडणारा चारूदत्त (पहिली लाट), खेड्यातल्या लोकांची दु:खं पाहून जागृत झालेली सुखी संसारातील कालिंदी (घरट्या बाहेर) या व यासारख्या पात्रांच्याव्दारे वास्तवाचे दर्शन घडवित आदर्शाची दिशा दाखविण्याचा प्रयत्न खांडेकरांनी केला आहे. 'कल्चर्ड मोती', 'स्वर्ग आणि नरक', 'वादळ', 'नंदादीप', 'मोत्यांची माळ', 'समाधीवरील फुले', 'निसर्ग', इत्यादी त्यांच्या कथा लक्षणिय ठरल्या. विषयांची विविधता, अनुभवांचा आणि विचारांचा सखोलपणा या कथात जाणवतो. याच सुमारास १९३५ साली चित्रपट व्यवसायाच्या निमित्ताने खांडेकर कोल्हापूरला आले. खेड्यातील शाळेसाठी वाहून घेऊनही त्यांच्या पदरी निराशाच पडली होती म्हणून शिरोड्याची शिक्षकाची नोकरी सोडून ते पटकथा लेखनाकडे वळले चित्रपटाचा हेतू केवळ रंजनासाठी नाही. त्या माध्यमाचा उपयोग शिक्षणासाठी होऊ शकेल व त्यायोगे महाराष्ट्रातल्या अधिक लोकांच्या उपयोगी आपण पडू शकू असे खांडेकरांना या नव्या व्यवसायाविषयी वाटले. छाया, अमृत, ज्वाला, या चित्रपटांची कथानके त्यांनी या सुमारास लिहिली 'छाया' च्या पटकथेसाठी खांडेकराना तेंव्हा गोहर सुवर्णपदक मिळाले होते. हंस पिक्चर्स, प्रफुल्ल पिक्चर्स, नवयुग पिक्चर्स यांच्यासाठी त्यांनी पटकथा लिहिल्या. आपल्या मनातला ध्येयवाद साकार करायला जोवर संधी मिळाली तोवरच खांडेकरांनी पटकथालेखन केले. त्यांनी एंकदर आठरा पटकथा लिहिल्या पण पुढे चित्रपट व्यवसायात कलात्मक आणि ध्येयवादी भूमिकेपेक्षा बाजारूपणाचेच पारडे जड झाल्याने खांडेकरानी पटकथालेखन बंद केले व ते केवळ आपल्या साहित्यविश्वात रमू लागले .

१९४१ नंतर पाच–सहा वर्षे खांडेकरानी कथालेखनही फारसे केले नाही. त्यांच्या या मौनाचे कारण त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीत होते. दुसऱ्या महायुध्दानंतर जगभर भडकलेल्या महागाईने समाजाचे नैतिक अध:पतन सुरू झाले. त्याने खांडेकरांमधील कलावंताला हादरा बसला. जी सामाजिक मूल्ये त्यांनी आणि त्यांच्या पिढीने श्रध्देने जोपासली होती ती धडाधड त्यांच्यासमोर कोसळू लागली. पैसा मिळवताना समाज कशाचाही विधीनिषेध बाळगेनासा झाला अनिर्बंध लोभाने व पैशाच्या हव्यासाने माणसाची मने ध्येयशून्य आणि पापप्रवृत्त करून सोडली माणुसकीवर श्रध्दा असणाऱ्या खांडेकरांची कला त्यामुळे आगतिक झाली. त्यामुळे १९४१ ते १९४७ या पाच–सहा वर्षात खांडेकरानी कथा लिहिली नाही. तरी या काळातील बदलत्या सामाजिक परिस्थितीचे त्यांचे निरीक्षण आणि चिंतन चालत राहिले. आणि १९४७ साली 'तीन जगे' ही कथा लिहून खाडेकरानी आपले मौन सोडले. १९४७ ते १९६४ हा खांडेकराच्या कथालेखनाचा तिसरा टप्पा ठरला. नव्या अध:पतित जीवनमूल्ये आणि समाजमूल्ये ढासळलेल्या समाजाचे चित्रण करीत त्यावर आपले भाष्य या काळातील कथालेखनात खांडेकरानी प्रामुख्याने अविष्कृत केले. सांजवात, हस्ताचा पाऊस, प्रितीचा शोध, प्रसाद, मुरली, उ:पशाप, ढगा आडचं चांदणं. हे त्यांचे कथासंग्रह याकाळात प्रसिध्द झाले. या काळातील त्यांच्या कथा

वैशिष्ट्यांचे वर्णन करताना प्रा . म . ना . अदवंत म्हणतात 'सामाजिक जीवनातील विलक्षण परिवर्तनामुळे खांडेकरांच्या मनात जी वैचारीक वादळे निर्माण होऊलागली त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कथात अधिकांशाने पडले . या वैचारिक वादळांना अग्रस्थान मिळाले आणि ती व्यक्त करण्यासाठी कथा निर्माण होऊ लागली . त्यामुळे तत्वचिंतक खांडेकरच आपणाला या कथामधून प्रामुख्याने दिसू लागले . आशयगर्भता व आपल्या काळातील समाजातील स्थिती गती हाच खांडेकरांच्या चिंतनाचा तसेच कथालेखनाचा प्रमुख विषय बनला .' प्रा . अदवंत यांच्या वरील विधानाचा प्रत्यय दोन मोसंबी, सोन्याची गाडी, सांजवात, भोवरा, नवे नाटक, मुक्ती, आस्तिक, शिखर, शांती, उ :पशाप, पराभव, भिंत, पूल, या व यासारख्या कथामधून प्रकर्षाने जाणवतो .

कथेप्रमाणेच रूपककथा, कादंबरी, लघुनिबंध, समीक्षा, हे वाङमयाचे विविध प्रकारही खांडेकरानी यशस्वीरित्या हाताळले . १९३० सालच्या मीठाच्या सत्याग्रहापासून प्रेरणा घेऊन 'सागरा आगस्ती आला!' ही पहिली रूपककथा लिहिली ती १९३१ साली प्रसिध्द झाली . त्यानंतर नितीकथा, काव्यकथा, प्रितीकथा, दृष्टांतकथा, अशा सुमारे दीडशे रूपककथा त्यानी लिहिल्या . रूपककथा हा कथाप्रकार खांडेकरांच्या लेखनीला विशेष मानवला कल्पनाविलास, चमत्कृती, काव्यात्मकता आणि तत्वप्रतिपादनाची आवड या सर्व वैशिष्ट्यांचा संगम खांडेकरांच्या रूपककथातून झालेला आढळतो . कलिका, मृगजळातल्या कळ्या, सोनेरी सावल्या, वनदेवता, सुवर्णकण, वेचलेली फुले . या रूपककथा संग्रहामधून विविध आशयाच्या व विविध घाटाच्या कथा कथात्मक रूपकातून सहजरितीने अविष्कृत झालेल्या आहेत . कल्पनपची चमत्कृती मार्मिकतेबरोबरच मर्मभेदकरा हे गुण खांडेकरांच्या रूपककथाना प्रभावी बनवतात . सामाजिक जीवनातील स्वार्थी व कपटी प्रवृत्तीवरही भाष्य करण्याचे प्रभावी साधन म्हणून खांडेकरानी रूपककथांचा वापर केला आहे . त्याचबरोबर सतत अतृप्त राहणाऱ्या मानवी प्रवृत्तीवरही खांडेकरानी प्रकाश टाकला आहे . मराठी रूपककथांचे दालन फक्त खांडेकरानीच समृध्द केले आहे . ही त्यांची मोठीच वाङमय विषयक कामगिरी आहे .

कथा व रूपककथा या वाङमप्रकाराबरोबरच कांदबरी हा वाङमयप्रकारही खांडेकरानी समृध्द केला आहे . १९३१ साली त्यानी 'हृदयाची हाक' ही पहिली कादंबरी लिहिली . ही कादंबरी वाचकांच्या पसंतीस उतरली आणि कादंबरीकार या पदावर खांडेकरांचा हक्क प्रस्थापित झाला . १९३० ते १९४२ या बारा वर्षात त्यानी सलग बारा कादंबऱ्या लिहिल्या . कांचनमृग, उल्का, दोन ध्रुव, हिरवा चाफा, दोन मने, रिकामा देव्हारा, सुखाचा शोध, पहिले प्रेम, जळलेला मोहर, पांढरे ढग, क्रौंचवध या कादंबऱ्या एकामागोमाग एक प्रसिध्द झाल्या व यातून सहृदयता, संवेदनक्षमता, सौदंर्य, सौजन्य, साधुत्व, आणि मूल्यावरील अनन्यसाधारण निष्ठा ल्यायलेली व्यक्तिमत्वे विणली गेली . १९४२ नंतर मात्र १९५४ पर्यंत जवळजवळ एक तपाच्या काळात खांडेकरानी कादंबरीलेखन केले नाही . आपल्या या मूकपणाचे कारण देताना खांडेकर म्हणतात 'पूर्वी जी श्रध्दास्थाने माझ्या साहित्यनिर्मितीला प्रेरक झाली होती त्यांची अनुभवांच्या संशोधन शाळेत तपासणी करून घेणे मला पावलोपावली आवश्यक वाटू लागले होते . हा सारा खटाटोप माझ्यासारख्या सामान्य मनुष्याच्या मानसिकशक्तीना पेलवण्यासारखा नव्हता . सूर्यप्रकाशात फुलायची माझ्या मनाला सवय होती . या दशकातल्या अंधारात ते कांही केल्या पूर्वीसारखे फुलेना .' झपाट्याने बदलणारी सामाजिक परिस्थिती खांडेकरांच्या मौनाला कारणीभूत ठरली तरी याच परिस्थितीच्या चिंतनातून १९५४ नंतर खांडेकरांनी पुन्हा कादंबरीलेखन केले . या लेखनाची गती कमी असली तरी परिपक्व मनाच्या चिंतनातून बाहेर पडलेल्या कलाकृती असेच या कादंबरी लेखनाचे स्वरूप होते . अश्रु, ययाती, अमृतवेल, सोनेरी स्वप्ने भंगलेली अशा कादंबऱ्या लिहून खांडेकरानी आपले वैशिष्ट्य पुन्हा एकदा सिध्द केले . त्यांच्या ययाती या कादंबरीला १९७४ सालचे 'ज्ञानपीठ' हे पारितोषक मिळाले . खांडेकरांच्या अनेक कादंबऱ्याचे निरनिराळ्या भारतीय भाषात भाषांतरेही झाली . प्रतिथयश कादंबरीकार म्हणून खांडेकरांचा नावलौकिक झाला तरी त्यांचे लेखन एकाच ठिकाणी बध्द होऊन राहिले नाही . लेखनाची वेगवेगळी कार्यक्षेत्रे खांडेकरांनी सहजपणे शोधली . अनुकरणापेक्षा उत्कट अनुभवातून स्वतंत्र मार्ग चोखाळण्याची त्यांची वृत्ती त्याना साहित्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रात घेऊन गेली .

रूपककथेप्रमाणेच लघुनिबंध हा वाङमयप्रकारही मराठी साहित्यात खांडेकरानीच समृध्द केला . 'वायुलहरी' हा त्याचा पहिला लघुनिबंध संग्रह १९३६ मध्ये प्रसिध्द झाला . मात्र खांडपकरांचे लघुनिबंधलेखन १९२६ पासूनच सुरू झाले होते . याविषयी खांडेकर लिहितात . 'मी लघुनिबंध लिहायला सुरूवात केली त्यावेळी आपण जे कांही लिहित आहोत त्याला लघुनिबंध म्हणतात हे मला ठाऊकही नव्हते! स्वत :च्या रंजानाकरिता एखादे गाणे म्हणायला सुरूवात करावी आणि मग खूप वेळाने आपण अमुक राग गात आहोत असे लोकाकडून त्याला कळावे तसाच थोडासा हा प्रकार झाला .' या त्यांच्या स्पष्टोक्तीवरून असे दिसून येते की खांडेकरांकडून नकळतपणे या लेखनप्रकाराची निर्मिती झाली . प्रथम 'वैनतेय' या साप्ताहिकासठी व तद्नंतर स्वत :काढलेल्या 'ज्योत्स्ना' या मासिकासाठी म्हणून छोट्यामोठ्या अनुभवांच्या व निरीक्षणांच्या आधारे स्वैर अथवा मुक्त चिंतनात्मक मजकूर लिहिले आणि यातूनच खांडेकरांच्या लघुनिबंधाचे स्तोत्र वाहू लागले . 'मराठीतील लघुनिबंधाचे जनक' म्हणून खांडेकर सर्वपरिचित झाले . खांडेकरांच्या लघुनिबंधात विषयाची विविधता आहे . अगदी साध्यासाध्या विषयातून खांडेकरांनी जीवनाचे मर्म उलघडून दाखविले आहे . श्री, आवडते फुल, स्टेशन, झोपाळा, मच्छरदाणी, पतंग, टाचण्या, दोन पाहुणे, डोळे, उंबरातले किडे, अलंकारिक भाषा, कपड्याची किंमत, या व यासारख्या लघुनिबंधातून क्षुद्र विषयातले सौंदर्य ते उकलून दाखवितात . तर मानवी जीवन आणि मन यावर

भाष्य करत निसर्ग आणि मानव यांचे अवीट नाते मांडले आहे . लक्षणीय प्रारंभ, समृध्द जीवनाशय, चिंतनशीलता, सौंदर्यनिर्मिती, संवेदनक्षमता, व्यक्तिमत्वदर्शन व प्रासादिकभाषा ही त्याच्या लघुनिबंधाची गुणवैशिष्ट्ये आहेत . या गुणवैशिष्ट्याच्या मुक्त अविष्कारातून खांडेकरांचे लघुनिबंधलेखन बहरत गेले . चांदण्यात, अविनाश, मंदाकिनी, कल्पकता, मंजिऱ्या, तिसरा प्रहर, मंजधार, झिमझिम, असे एका मागोमाग एक प्रसिध्द झालेले त्यांचे लघुनिबंधसंग्रह मराठी वाचकांना खांडेकरांच्या विचारांचे आणि व्यक्तिमत्वाचे अनेकरंगी दर्शन घडविते झाले .

लघुनिबंध असोत, रूपककथा असोत, कथा असोत वा कादंबऱ्या असोत खांडेकरांचे संवेदनशील मन आणि निरीक्षणकुशल बुध्दी यांच्या संगमातून विकास पावलेल्या व्यक्तिमत्वाचा अविष्कार पहायला मिळतो . शिक्षक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, पटकथालेखक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या खांडेकरांनी आपल्या अनुभविश्वाचे चिंतन करणं आणि ते शब्दबध्द करणं स्वाभाविकच होतं . गतजीवनाच्या स्मृतीना उजाळा देत खांडेकरांनी जे लेखन केले ते दोन पुस्तकांच्या रूपानं वाचकांपुढं आलं . पहिलं पुस्तक आहे 'ते दिवस ती मानसे' आणि दुसरं आहे 'एका पानाची कहाणी' १९६१ साली खांडेकरानी ते दिवस ती मानसे हे पुस्तक लिहिले . त्याला त्यांनी 'संस्मरणे' असे संबोधले असले तरी त्यात आत्मकथनाची झलक दिसून येते . या पुस्तकाच्या प्रस्तावनेत खांडेकर म्हणतात '... यात सलग आत्मकथन नाही . कांही कारणानी ज्या प्रसंगांची आणि व्यक्तींची स्मृती मनात तीव्रतेने जागृत झाली . त्या प्रसंगाचे अथवा व्यक्तीचे हे भावचित्रण आहे . आयुष्यातल्या पहिल्या पंचविशीतली ही कांही संस्मरणे आहेत . वाचकाना ती आवडली तर 'एका पानाची काहाणी' हे प्रदीर्घ आत्मकथन पुरे करायला मला धीर येईल .' हे पुस्तक वाचकांच्या पसंतीस उतरले तरी खांडेकरांनी 'एका पानाची काहाणी' हे आत्मकथन लिहिण्यास जवळजवळ वीस वर्षाचा कालावधी घेतला आणि खांडेकरांच्या निधनानंतर पाच वर्षानी १९८१ मध्ये त्यांचे आत्मकथन प्रसिध्द झाले . या आत्मकथनाच्या 'शिशिर' या नावाने लिहिलेल्या प्रस्तावनेत खांडेकर म्हणतात . 'ही कहाणी मी लिहावी म्हणून अनेक वर्षे मित्र व माझ्या वाङमयाचे चाहते आग्रह करीत आले होते . ... पूर्ण सत्य सांगता आलं नाही, तर मर्यादित सत्याला स्पर्श करण्याचा आपण प्रयत्न करावा, अस मला वाटू लागलं आयुष्याचा आपण जो अन्वयार्थ लावला तो मोकळेपणान मांडावा या एकाच हेतून मी आत्मकहाणी लिहित आहे . माझ्या पिढीतल्या सर्वसामान्य भारतीय मनुष्याचा एक प्रतिनिधी, एवढीच माझी, ही कहाणी लिहित असताना भूमिका आहे .' खांडेकरांची ही भूमिका जशी नम्रतेची आहे, प्रांजलतेची आहे तशी तत्वचिंतकाचीही आहे . प्रामाणिक आत्मनिवेदनामुळे या आत्मकथनाला अर्थ पूर्णता प्राप्त झाली आहे . खांडेकरांची मुल प्रवृती चिंतनशील लेखकाची असल्यामुळे त्यांचा स्वाभाविक कल आत्मशोधन करण्याकडे असल्याचे दिसून येते . खांडेकरांच्या व्यक्तिमत्वाच आगळेपण त्यांच्या आत्मवर्णनातून जसं प्रगट होतं तसंच त्यांच्या काव्यात्मक शैलीचं रूपही वाचकांपुढं येत व्यक्तीच्या जीवनात प्रत्यक्ष घडलेले प्रसंग कधी कल्पनेपेक्षाही विपरीत असतात याचे दर्शन या आत्मचरित्रातून घडते म्हणूनच खांडेकरांचे हे आत्मकथन वास्तववादी साहित्यकृती ठरले आहे .

आपल्या अष्टपैलू प्रतिभेने साहित्यक्षेत्रात चौफेर प्रवास करणाऱ्या खांडेकरांनी साहित्य समीक्षेच्या क्षेत्रातही आपला वेगळा ठसा उमटवला आहे . जीवनासाठी कला या मताचा पुरस्कार करत कलेला बाह्य  सौंदर्याइरकीच किंबहुना त्याहून अधिक अंत:सौंदर्याची आवश्यकता असते आणि श्रेष्ठ साहित्यात स्वभावत:च या दोहोंचा संगम झालेला असतो असे स्पष्ट मत खांडेकरानी मांडले . साहित्याची आणि साहित्यिकाची सामाजिक जबाबदारी खांडेकराना नेहमीच महत्वाची वाटत आली . अध्यक्षिय भाषणे, पुस्तकांच्या प्रस्तावना, नवलेखकांना उत्तेजने, ग्रंथपरीक्षणे यांच्या व्दारे खांडेकरांचे साहित्यविषयक आणि समीक्षाविषयक विचार प्रगट झाले आहेत .  गडकरी : व्यक्ती आणि वाङमय, अगरकर : व्यक्ती आणि विचार, वामन मल्हार जोशी : व्यक्ती आणि विचार, केशवसुत : काव्य आणि कला, वनभोजन, धुंधुर्मास, गोकर्णीची फुले, फुले आणि काटे, गोफ आणि गोफण, तीन संमेलने, मराठीचा नाट्यसंसार, रेषा आणि रंग, रंग आणि गंध, अभिषेक या त्यांच्या समीक्षाग्रंथातून लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा आणि वाङमयाचा अभ्यास व साहित्यविषयक चर्चा असे खांडेकरांच्या समीक्षालेखनाचे स्वरूप असल्याचे स्पष्ट दिसून येते . साहित्याचे स्वरूप, साहित्याचे प्रक्षेपण, कला आणि जीवन यांचे संबंध, मराठी साहित्याची स्थिती, काळाचे अव्हान स्विकारण्याचे आणि नवनव्या समस्यांच्या चित्रणाचे साहित्याचे सामर्थ्य, साहित्याला विघातक प्रवृत्ती, साहित्यिकांचे कर्तव्य अशा अनेक विषयांची चर्चा प्रसंगानुरोधाने खांडेकरांनी केली आहे . 'जीवनातल्या अंतिम सत्याचा शोध घेत राहणे आणि त्या शोधात जे जे आपल्याला उत्कटतेने व अपूर्वाईने जाणवेल, ते ते अत्यंत सुंदररितीने व्यक्त करणे हा ललितसाहित्याचा मुख्य हेतू आहे .' अशा शब्दात खांडेकरांनी साहित्याचे प्रयोजन सांगितले आहे . मानवी मनावर संस्कार करण्याला खांडेकर अधिक महत्व देतात . सौंदर्यदृष्टी, सहृदयता, वैयक्तिक तत्वाज्ञान, सूक्ष्म निरीक्षण व कलाचातुरी हे ललितलेखनाचे पंचप्राण आहेत असे खांडेकरांनी आपले मत मांडले आहे . ललितसाहित्य ही मूलत: जशी कला आहे तशीच ती एक सामाजिक शक्तीही आहे . मनुष्याच्या हृदयातील परमेश्वराला जागृत करणारे वाङमयच समाजाचे कल्याण करील असे ठाम मत खांडेकरांनी वाङमयाच्या निर्मितीची चिकित्सा करताना मांडले आहे .

खांडेकरांनी आपल्या लिखाणातून साहित्यविषयक महत्वाच्या विषयाची चर्चा केली आहे . आदर्श, उच्च जीवनमूल्ये आणि कलामूल्ये यांची सांगड घालून मानवी कल्याणाचा विचार करणारे ते लेखक आहेत . कला आणिा सामाजिक जीवन यांचा संबंध

अत्यंत अन्योन्य आहे असे खांडेकरानी आपल्या साहित्याव्दारे सिध्द केले आहे . साहित्याने समाजातल्या आणि देशातल्या माणसांच्या पिढ्या घडवाव्यात त्यांना थोर कर्तृत्वाची प्रेरणा द्यावी, त्यांना अंतर्मुख करावे अशी खांडेकरांची अपेक्षा आहे . सहृदयता आणि संवेदनक्षमता यांनी खांडेकरांच्या व्यक्तिमत्वाचा पदर विणलेला आहे . सौंदर्य, सौजन्य आणि साधुत्व या मूल्यांवर त्यांची अनन्यसाधारण निष्ठा आहे . जीवनातील उदात्ततेचे, भव्यतेचे, कलात्मकतेचे, काव्यात्मकतेचे आणि कारूण्याचे आकर्षण खांडेकरांना मूळापासून आहे . यातूनच त्यांच्यातला तत्वचिंतक लेखक घडत गेला आहे . ललितवाङ्मयाच्या मंगल शक्तीवर खांडेकरांची अखंड श्रध्दा आहे . आणि या श्रध्देतूनच त्यांची सारी वाङ्मय निर्मिती झाली आहे . त्यांच्या वाङ्मयाची आजपर्यंत पुष्कळ समीक्षाही झाली आहे . कुणी त्यांच्या लेखनाला गौरविले तशी कुणी टिकाही केली . 'सामान्य वाचकांचा एक सामान्य लेखक' असा दोषारोपही त्यांच्यावर झाला . तरी मराठी साहित्यक्षेत्रातील आणि वाचकांच्या हृदयसिंहासनावरील खांडेकरांच्या स्थानाला कुठेही धक्का लागला नाही . सौंदर्यशोधनाच्या आणि आदर्शपूजनाच्या खांडेकरांच्या वृत्तीने व तिच्या साहित्याविष्काराने वाचकांना उन्नात आणि उदात्त स्वरूपाचे जीवन जगण्याचे सामर्थ्य दिले . हे त्यांच्या लेखनाचे खरे वैशिष्ट्य आणि सामर्थ्य आहे . मानवता हा त्यांच्या साहित्याचा आत्मा आहे . साहित्यात आणि समजजीवनात येणाऱ्या नवनवीन लाटांचे विश्लेषण करून त्यांचे स्वागत करण्याची भूमिका खांडेकरांनी आपल्या लेखनात ठेवली . कोणत्याही मोहाने किंवा आघाताने त्यांची तत्वनिष्ठा ढळली नाही . समाजात उच्च नितीमूल्यांची पडझड होत असताना त्यांचा तोल सावरून धरण्यासाठी आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्याचा उपयोग आपल्या लेखनाव्दारे खांडेकरांनी शेवटपर्यंत केला . मानवतेवरील प्रेम आणि विशाल अंत:प्रवृत्ती याच खांडेकरांच्या लेखनाच्या मुळ प्रेरणास्त्रोत होत्या . याच प्रेरणास्तोत्रातून अविष्कृत झालेला त्यांच्या लेखनाचा नंदादीप मराठी साहित्य शारदेच्या मंदिरात अखंड तेवत आहे व सर्वांना जीवनवादी मानवतेचा संदेश देत आहे .

परिशिष्ट १

खांडेकरांची साहित्यसंपदा :

अ) कथासंग्रह :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नवमल्लिका | १५ | नवा प्रात:काळ |
| २ | दत्तक आणि इतर गोष्टी | १६ | कल्चर्ड मोती |
| ३ | जीवनकला | १७ | पहिल्यावहिल्या |
| ४ | ऊन-पाऊस | १८ | स्त्री आणि पुरूष |
| ५ | दवबिंदू | १९ | अश्रू आणि हास्य |
| ६ | विद्युल प्रकाश | २0 | हस्ताचा पाऊस |
| ७ | नवचंद्रिका | २१ | पाकळ्या |
| ८ | अबोली | २२ | सांजवात |
| ९ | सूर्यकमळे | २३ | प्रीतीचा शोध |
| १0 | पूजन | २४ | प्रसाद |
| ११ | समाधीवरील फुले | २५ | मुरली |
| १२ | पहिली लाट | २६ | उ:शाप |
| १३ | फुले आणि दगड | २७ | ढगाआडचं चांदणं |
| १४ | घरट्याबाहेर | | |

ब) कादंबरी :

| | | |
|---|---|---|
| १ | हृदयाची हाक | १९३० |
| २ | कांचनमृग | १९३१ |
| ३ | उल्का | १९३५ |
| ४ | दोन ध्रुव | १९३६ |
| ५ | हिरवा चाफा | १९३७ |
| ६ | दोन मने | १९३८ |
| ७ | रिकामा देव्हारा | १९३९ |
| ८ | सुखाचा शोध | १९३९ |
| ९ | पांढरे ढग | १९३९ |
| १० | जळलेला मोहोर | १९४१ |
| ११ | क्रौंचवध | १९४२ |
| १२ | अश्रू | १९५४ |
| १३ | ययाती | १९६० |
| १४ | अमृतवेल | १९६७ |
| १५ | सोनेरी स्वप्नं भंगलेली | १९७७ |

क) लघुनिबंधसंग्रह :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | वायुलहरी | ६ | कल्पलता |
| २ | चांदण्यात | ७ | मंजिऱ्या |
| ३ | सायंकाळ | ८ | तिसरा प्रहर |
| ४ | अविनाश | ९ | मंझधार |
| ५ | मंदाकिनी | १० | झिमझिम |

ड) रूपककथासंग्रह :

| | |
|---|---|
| १ | कलिका |
| २ | मृगजळातल्या कळ्या |
| ३ | सोनेरी सावल्या |
| ४ | सुवर्ण कण |
| ५ | वनदेवता |
| ६ | वेचलेली फुले |

इ) आत्मकथने :

| | |
|---|---|
| १ | ते दिवस, ती माणसे |
| २ | एका पानाची कहाणी |

ई) नाटक :

| | |
|---|---|
| १ | रंकाचे राज्य |

उ) समीक्षा ग्रंथ :

| | |
|---|---|
| १ | गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय |
| २ | आगरकर : व्यक्ती आणि विचार |
| ३ | वामन मल्हार जोशी : व्यक्ती आणि विचार |
| ४ | केशवसुत : काव्य आणि कला |
| ५ | वनभोजन |
| ६ | धुंधुर्मास |
| ७ | गोकर्णीची फुले |
| ८ | फुले आणि काटे |
| ९ | घोफ आणि गोफण |
| १० | तीन संमेलने |
| ११ | मराठीचा नाट्यसंसार |
| १२ | रेषा आणि रंग |
| १३ | रंग आणि गंध |
| १४ | अभिषेक |

परिशिष्ट २

संदर्भसूची :

१ . कानडे . मु . श्री व खांडेकर भालचंद्र : गाभारा अनमोल प्रकाशन, पुणे
२ . कुरंदकर नरहर : धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९९०
३ . कुलकर्णी अनिरूध्द : प्रदक्षिणा भाग १ व २, कॉन्टिनेंट प्रकाशन, पुणे
४ . कुलकर्णी वा . ल . : टिपा आणि टिपणी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
५ . खांडेकर वि . स . (संपा) : पारिजात, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६०
६ . खांडेकर वि . स . : रंग आणि गंध, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६१
७ . खांडेकर वि . स . : अभिषेक, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६०
८ . खांडेकर वि . स . : रेषा आणि रंग, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६१
९ . देशपांडे कुसुमावती : मराठी कादंबरी पहिले शतक, मौज प्रकाशनगृह, मुंबई
१० . भोसले एस . एस . : खांडेकर व्यक्ती आणि साहित्य, कॉन्टिनेंट प्रकाशन, पुणे

११. भोसले एस.एस. : साहित्यिक खांडेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
१२.हातकणंगलेकर.म.द. : वि.स.खांडेकर, साहित्य अकादमी प्रकाशित शोधनिबंध
www.marathimaitree.blogsopot.com
www.mr.wikipelia.org.com
www.miloonsaryajani.com

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org